राज्य ग्रंथालय परिषदेच्या उपसमितीस अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
**शासन निर्णय मराग्रं-२०२६/प्र.क्र.४३/ई-१५७४७५८/ग्रं.क.**
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई.
दिनांक : १२ मे, २०२६.

वाचा :-

१) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. मराग्रं-२०२५/प्र.क्र.५८/ई-१०९३६०१/ग्रं.क., दि.२५.०९.२०२५

२) उच्च व तंत्र शिक्षण विभाग शासन निर्णय क्र. मराग्रं-२०२६/प्र.क्र.४३/ई-१५७४७५८/ग्रं.क., दि.१८.०३.२०२६

३) ग्रंथालय संचालक,ग्रंथालय संचालनालय यांचे पत्र क्र.३४/राग्रंपउपसमिती/२०२६-२७/२६३, दि.१५.०४.२०२६

प्रस्तावना :-

राज्य ग्रंथालय परिषदेच्या दि.०६.०१.२०२६ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमधील निर्णयानुसार ग्रंथालय संचालनालयामार्फत अभ्यासिका स्थापन करणेबाबत सर्वंकष धोरण ठरविणे व राज्य ग्रंथालय परिषद व जिल्हा ग्रंथालय समित्यांची कार्यपध्दती नियम १९७३ यामध्ये कालानुरुप सुधारणा करणे या विषयांच्या अनुषंगाने शिफारशी करण्यासाठी उपरोक्त वाचा क्र.२ येथील शासन निर्णयानुसार उपसमिती गठित करण्यात आली आहे. सदर उपसमितीस अहवाल सादर करण्यासाठी आणखी कालावधी लागणार असल्याने सदर समितीस मुदतवाढ देण्याची विनंती ग्रंथालय संचालक यांनी संदर्भीय क्र.३ येथील पत्रान्वये केली आहे. त्यानुषंगाने या उपसमितीस अहवाल सादर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय :-**

राज्य ग्रंथालय परिषद व जिल्हा ग्रंथालय समित्यांची कार्यपध्दती नियम १९७३ यामध्ये कालानुरुप सुधारणा करणे आणि ग्रंथालय संचालनालयामार्फत अभ्यासिका स्थापन करणे यासंदर्भात शिफारसी करण्यासाठी राज्य ग्रंथालय परिषदेची उपसमिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीस आपला अहवाल सादर करण्यासाठी दोन महिन्यांची मुदतवाढ देण्यात येत आहे. समितीने उक्त कालावधीत आपला अहवाल शासनास सादर करावा.

२. हा शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२६०५१२१५०३५७४९०८ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2026.05.12 15:04:52 +05'30'

(अजित ता. कुंडले)

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रत :-**

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
२. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
३. अपर मुख्य सचिव (उच्च व तंत्र शिक्षण विभाग) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई
४. प्रधान सचिव (शालेय शिक्षण विभाग) मंत्रालय, मुंबई-३२.
५. संचालक, माहिती व तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई
६. धर्मादाय आयुक्त, धर्मादाय आयुक्त भवन, २ रा मजला, सासमिरा बिल्डींग, सासमिरा रोड, वरळी, मुंबई.
७. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८. सर्व सदस्य राज्य ग्रंथालय परिषद (ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत)
९. सर्व सहायक ग्रंथालय संचालक / जिल्हा ग्रंथालय अधिकारी, ग्रंथालय संचालनालय
१०.निवड नस्ती, ग्रंथालय कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.